# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org


## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय:— महाप्रसाद विभागात बनविण्यात येणाऱ्या लाडुमध्ये वापरण्याकरीता खादयरंगाची विहित पध्दतीने दरपत्रके मागवून खरेदी करणेबाबत**

सन २०२६—२७ या वर्षभराच्या कालावधीकरीता महाप्रसाद विभागात बनविण्यात येणाऱ्या लाडूमध्ये वापरण्याकरीता खादयरंगाची विहित पध्दतीने खरेदी करण्याकरीता मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| दरपत्रके प्रसिध्द दिनांक | —: बुधवार दि. ११ फेब्रुवारी, २०२६ |
| कच्चा माल तपासणीसाठी सादर करावयाचा अंतिम दिनांक | —: बुधवार दि. १८ फेब्रुवारी, २०२६ सांय. ६.०० वा. |
| दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | —: गुरूवार दि. २६ फेब्रुवारी, २०२६ दु. ६.०० वा |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | —: शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी, २०२६ दु. २.०० वा |

### अटी व शर्ती

१) प्रत्येक कंत्राटदाराने तांत्रिक कागदपत्रे आणि मुल्य दरपत्रक दोन वेगवेगळया मोहोरबंद (A4) लखोटयात सादर करावीत. मोहोरबंद लिफाफ्यावर कामाच्या विषयाबाबतचा उल्लेख असावा.

२) दरपत्रकामध्ये सर्व समावेशक खर्चासह मूळ दर असावा व कर अतिरीक्त असा उल्लेख करावा.

३) दरपत्रकधारकाने मोहरबंद तांत्रिक लखोटयात साक्षांकीत करुन सादर करावयाची कागदपत्रे

(अ) आयकर नोंदणी (पॅनकार्ड)

(ब) कंपनी नोंदणी दाखला

(क) सेवाकर (जी एस टी) नोंदणी दाखला

(ड) अद्ययावत एफ. एस. एस. ए. आय. प्रमाणपत्र (Fassai Registration Certificate)

(ई) वार्षिक उलाढालीसंबंधित सनदी लेखापालाचे तीन वर्षाचे प्रमाणपत्र

(फ) खादयरंगाचा पुरवठा करण्याचा तीन वर्षाचा अनुभव दर्शविणारी कागदपत्रे (धार्मिक/सामाजिक संस्था/शासकीय निमशासकीय कार्यालय/हॉटेल इ. ठिकाणी पुरवठा केल्याबाबतची कागदपत्रे उदा. बिल/कार्यादेश, पुरवठा आदेश इ. पैकी एक सादर करणे आवश्यक आहे.)

४) अपूर्ण कागदपत्रासाहित सादर केलेली दरपत्रके विचारात न घेता अपात्र ठरविली जातील. दरपत्रके स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा संपूर्ण अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे त्याबद्दलची कारणे देणे न्यास व्यवस्थापन समितीवर बंधनकारक राहणार नाही.

५) न्यासास पुरवठा करावयाचा कच्चा माल व प्रयोगशाळा तपासणीसाठी सादर करावयाचा कच्चा माल FSSAI standards अथवा न्यासाने दिलेल्या विनिर्देशानुसारच (Specification) असावा. प्रयोगशाळा तपासणी अहवालाच्या निकषावर पुरवठाधारक अंतिम करण्यात येईल. अशी कार्यवाही करताना कच्च्या मालाच्या गुणवत्तेचा, प्रयोगशाळा तपासणी अहवालाचा प्रथम विचार करण्यात येईल. केवळ न्युनतम दर प्राप्त झाला म्हणून दरपत्रक स्विकारण्याचे बंधन न्यासास/समितीस असणार नाही.

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org


६) कंपनीची वार्षिक उलाढाल न्यासाच्या वार्षिक परिमाणानुसार पुरवठा मालाच्या दुप्पट असणे आवश्यक असून त्यासाठी सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७) विहित प्रक्रियेमध्ये स्विकृत केलेले दर वर्षभरासाठी कायम राहतील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव ठेका कालावधीत भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास पुर्णत: किंवा अंशत: बॅक गॅरेंटीमधील रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. याप्रकरणी न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील.

८) खादयरंगाचे परिमाण हे ५ किलोच्या प्लास्टीक सिलबंद डब्यामध्ये असणे आवश्यक आहे.

९) न्यासाच्या आवश्यकतेनुसार दरमहा अथवा कमी जास्त मुदतीत मालाची मागणी केली जाईल. एकदम सर्व माल घेतला जाणार नाही. मागणीनुसार माल स्विकारला जाईल तसेच मागणीपेक्षा जास्त आलेला माल स्विकारला जाणार नाही. मालाचे परिमाण अंदाजे असल्याने, प्रत्यक्षात कमी–जास्त मागणी होवू शकेल, त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

१०) पुरवठादाराने मालाची पोहोच स्वखर्चाने श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई येथे न्यासाचे खरेदी विभागाच्या गोडाऊनमध्ये पॅकींग व फॉरवर्डींगसह दिली पाहिजे. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाकडून मालाच्या वाहतुकीचा व वाराईचा खर्च वेगळा दिला जाणार नाही. माल खरेदी विभागाच्या गोडाऊन शिवाय इतरत्र उतरवू नये. असे केल्यास माल गोडाऊनमध्ये पोहचविण्याचे लेबर चार्जेस बिलातून कपात करण्यात येईल.

११) निविदाकाराने पुरवठा आदेश निर्गमित झाल्यापासून कमाल तीन दिवसात मालाचा पुरवठा करणे आवश्यक असेल. विहित मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यामुळे न्यासाची अडचण/नुकसान होऊ नये म्हणून न्यासाला बाजार भावाने आवश्यकतेनुसार किंवा पुरवठा आदेशात नमूद परिमाणाचा माल खरेदी करण्याचे अधिकार/मुभा असेल. बाजारभावाने खरेदी केल्यामुळे जादा अदा केलेल्या रकमेची भरपाई पुरवठादारास करावी लागेल. सदर भरपाई देयकाच्या रकमेतून वा बयाना रकमेतून करण्यात येईल

१२) न्यासास पुरवठा केलेल्या मालाची प्रयोगशाळा तपासणी करण्यात येईल. सदर तपासणी शासकीय / निमशासकीय / बृहनमुंबई महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाकडील प्रयोगशाळेतून अथवा अन्न व औषध प्रशासनाने प्राधिकृत केलेल्या प्रयोगशाळेतून करणेत येईल. त्याकरीता होणारा खर्च आपण सादर केलेल्या देयकातून वजा करुन देयक अदा करण्यात येईल. त्याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही. दिलेला माल FSSAI Standards किंवा विनिर्देशानुसार नसल्यास अश्या पुरवठा केलेल्या मालासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**(अ)** अपात्र/सदोष ठरलेला माल परत घेवून त्याऐवजी विनिर्देशित गुणवत्तेचा व दर्जेदार माल कमाल चार दिवसांत पुरविणे पुरवठाधारकास बंधनकारक राहील. अपात्र/सदोष वापरलेल्या मालाचे देयक अदा करताना त्यामधून २०% कपात दंड म्हणून करण्यात येईल.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
(Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

**(ब)** न्यासास पुरवठा केलेला अपात्र/सदोष माल एका आठवडयामध्ये स्वखर्चाने व जबाबदारीने परत नेणे पुरवठादारावर बंधनकारक असेल, अशा परत न नेलेल्या मालाचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी न्यासावर असणार नाही व अशा पुरवठा केलेल्या मालाच्या अनुषंगाने कोणतेही प्रदान/अदायगी केली जाणार नाही

१३) बिलामध्ये मूळ दर व अतिरीक्त कर दराचा उल्लेख करावा. सरकारी नियमानुसार आवश्यक तेथे आयकर कपात केली जाईल. देयक सादर करतांना देयकात, खरेदी आदेशातील वर्णनाप्रमाणेच मालाचे नावाचा पुरवठा करणेत आलेल्या मालाची तपासणी करून, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात येईल. मालाच्या पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१४) पुरवठादारास देयकाची रक्कम कंपनीच्या नावे आर.टी.जी.एस.द्वारे अदा करण्यात येईल.

१५) आपात्कालीन परिस्थितीत उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा,शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.

१६) दरपत्रके भरताना तांत्रिक कागदपत्रे आणि मुल्य दरपत्रक दोन वेगवेगळया मोहोरबंद (A4) लखोटयात गुरूवार दि. २६ फेब्रुवारी,२०२६ दु. ६.०० वा न्यासाच्या नोंदणी शाखेत सादर करावीत.

१७) शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी,२०२६ दु. २.०० वा तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडण्याच्या वेळी कंत्राटदार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी उपस्थित रहावे.

१८) दरपत्रकामध्ये नमूद कच्च्या मालाचा नमूना २०० ग्रॅम सीलबंद करून मंगळवार दि. १८ फेब्रुवारी,२०२६ रोजी सांय. ६.०० वा. वाजेपर्यंत न्यासाच्या प्रतीक्षालय इमारतीतील तळमजल्यावरील टपाल कक्षात जमा करणे आवश्यक राहील. निविदाकाराने तपासणीसाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम अभिषेक नोंदणी कक्षात भरून त्याची देणगीपावती नमून्यासोबत सादर करावी.

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## मुल्य दरपत्रकाचा तपशील

विषयः– महाप्रसाद विभागात बनविण्यात येणाऱ्या लाडुमध्ये वापरण्याकरीता खादयरंगाची विहित पध्दतीने दरपत्रके मागवून खरेदी करणेबाबत

नावः–––––––––––––––––––––––––––––––––––––

पत्ताः–––––––––––––––––––––––––––––––––––––

–––––––––––––––––––––––––––––––––––––

पॅनकार्ड क्रमांक :–––––––––––––––––––––––––––––

सेवाकर नोंदणी क्रमांक :–––––––––––––––––––––––––

| अ. क्र. | कच्च्या मालाचा तपशील | प्रती किलो दर (कर वगळून–सर्व समावेशक खर्चासह मूळ दर) |
|---|---|---|
| | खादयरंग | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का